नियमित फौजदारी खटला क्र. ०८/२०१७
सरकार वि. आजिनाथ वगैरे
निशाणी क्र.– १०६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ चा पुरावा**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,
माझे नाव — रेवन्नाथ कारभारी रांझणे,
वय — ५९ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त,
राहणार — खामगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**सर तपासणी**

**अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

१. सन २०१६ साली मी पाथर्डी पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत होतो. दिनांक २६/१०/२०१६ रोजी दिवशी माझ्याकडे गु.र.क्र. ४८३/२०१६ भा.दं.वी.कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह १४९ चा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. सदर गुन्हयाची फिर्याद ठाणे अंमलदार असल्याने मीच नोंदवुन घेतली होती. त्यानंतर दुस–या दिवशी घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावरती माझी तसेच पंचांच्या सहया आहेत. **घटनास्थळ पंचनाम्यास निशाणी १०७ देण्यात** येते. त्यानंतर साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. **साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर याचा जबाब** मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यांचे **जबाबातील साक्षांकित भाग अ** मला दाखविण्यात आले. तो त्यांच्या सांगणेप्रमाणे नोंदविला असून खरा व बरोबर आहे. त्यांना **निशाणी १०८ देण्यात** येते. त्यानंतर मी गुन्हयातील आरोपींना हजर राहण्याबाबत नोटीस दिली. त्यानंतर आरोपींनी गुन्हयात वापरलेला गज हजर केल्याने तो दोन पंचांसमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावरती माझी तसेच पंचांच्या सहया आहेत. **जप्ती पंचनाम्यास निशाणी १०९ देण्यात** येते. जप्त लोखंडी गज हा मोहरीर यांचे ताब्यात देवून मुद्देमाल पावती तयार केली. जखमिंचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आजरोजी न्यायालयात आरोपी क्र.१ हजर आहे परंतु दुसरा आरोपी कोण आहे त्याला मी ओळखु शकत नाही.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. खेडकर यांचेकडुन सुरु**

२. प्रस्तुत गुन्हा तपास करण्याकरीता पोलिस निरीक्षक यांनी मला लेखी आदेश दिला होता. आरोपींनी कथीत लोखंडी हजर केल्याबाबत मी स्टेशन डायरीला नोंद घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर जप्ती पंचनामे पंचांसमक्ष तयार केले नसुन फिर्यादीच्या

सांगण्याप्रमाणे खोटे तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांच्या घरातील लोकां व्यतिरीक्त इतर लोकांचे जबाब मी नोंदवले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार सुधाकर दिनकर खेडकर यांच्या जबाबातील निशाणी–१०८ मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या पतीने माझ्याविरुध्द देखील अनेक तक्रारी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या दडपणाखाली येऊन खोटा तपास करुन आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.03.17 17:37:05 +0530

पाथर्डी.
दिनांक – १७/०३/२०२६.

**(रविकिरण सपाटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. १, पाथर्डी.